# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.९ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## अशोक चव्हाणांच्या नांदेडमध्ये नरेंद्र मोदींचा काँग्रेसवर हल्लाबोल

### म्हणाले; यांनी एकापेक्षा एक घोटाळे केले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदेड**

नांदेडमध्ये महायुतीची भव्य प्रचारसभा होत आहे. या सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार अशोक चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नांदेडकरांना संबोधित करत आहेत. भारत माता की जय, जय भवानी जय शिवाजी, माहूरची रेणुका देवी, मालेगावचा खंडोबा, उणकेश्वर महादेव, विष्णुपुरी काळेश्वर मंदिर यांच्या चरणी नतमस्तक होतो. स्वामी रामानंद तीर्थ स्वातंत्र्यसेनानी यांना प्रमाण करतो, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणाला सुरुवात केली आहे. यावेळी नरेंद्र मोदी आणि त्यांच्या आईचा फोटो एक भाजप प्रेमी त्यांना दिला आहे.



**काँग्रेसवर हल्लाबोल**

काँग्रेसने एकापेक्षा एक घोटाळे केले. काँग्रेसने फसवणुकीत स्वतःचं रेकॉर्ड मोडलं आहे. काँग्रेसच्या लाल पुस्तकावर संविधान लिहिलं आहे, मात्र ते उघडून पाहिलं नंतर ते कोरी आहे. संविधानाच्या नावावर लाल पुस्तक छापायचं. काँग्रेसवाले देशात बाबासाहेबाचे नाही स्वतःच संविधान चालवण्याचा प्रयत्न करत आहेत. काँग्रेस वेगळी पुस्तक संविधानाचा मजाक उडवत आहे. काँग्रेसला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाची द्वेष आहे. संविधानासोबत सगळ्यात पहिला विश्वासघात काश्मीरमध्ये केला होता, असं म्हणत नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**नांदेडकरांना नरेंद्र मोदी यांचं आवाहन**

भाजप आणि महायुतीच्या समर्थनात एक लाट सुरू आहे. आज सगळ्यांच्या तोंडात एकच नारा आहे, महायुती आहे तर गती आहे, महाराष्ट्राची प्रगती आहे. लोक भाजप आणि महायुती सरकार पुन्हा पुन्हा निवडून देत आहेत. महायुतीला तिसऱ्यांदा संधी दिली आहे. नांदेडचे फुल नव्हतं यामध्ये यावेळी नांदेडचे फुल पोहचेल का? असं म्हणत नांदेडमधून लोकसभेच्या पोट निवडणुकीत भाजप उमेदवाराला निवडून देणार का?, असा सवाल मोदींनी नांदेडकरांना केला.

**मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर नरेंद्र मोदी यांचं भाष्य**

१० वर्षात दुष्काळावर काही उपाय योजना केल्या आहेत. मराठवाड्यात ११ सिंचन योजनेला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांचं हित हे आमचं प्राधान्य आहे. नांदेडमध्ये ५ लाखपेक्षा ज्यास्त शेतकऱ्यांना १ हजार ५०० कोटी रुपये दिले आहेत. समृद्धी महामार्गामुळे विकासाला नवी चालना मिळाली आहे. नांदेड ते दिली विमानसेवा सुरू झाली आहे. अमृतसर यात्रा विमानसेवा सुरू होणार आहे. ३ कोटी महिलांना लखपती दीदी बनवत आहोत गावातली माझी दीदी लखपती बनेल. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला महाराष्ट्रतील माता भगिनी आशीर्वाद देण्यासाठी पुढे येत आहेत, असंही मोदी यावेळी म्हणाले.

## पंतप्रधान मोदी आहेत पळणारा चित्ता म्हणून तर गिरवत आहेत विकासाचा कित्ता

### रामदास आठवलेंची कवितेतून तुफान फटकेबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अकोला**

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. ठिकठिकाणी प्रचारसभा सुरु आहेत. या सभांमध्ये राजकीय नेत्यांकडून एकमेकांवर टीका टिप्पणी आणि आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. अशात आताच आता रामदास आठवले यांनीही त्यांच्या कवितेतून जोरदार फटकेबाजी केली आहे.



**अकोल्यात महायुतीची विशाल सभा**

अकोल्यात आज महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला पंतप्रधान मोदी यांच्यासह केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रतापराव जाधव, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, शिवसेनेचे ( एकनाथ शिंदे) नेते आनंदराव अडसुळ उपस्थित होते. यावेळी बोलताना, रामदास आठवले यांनी त्यांच्या खास शैलीत विरोधकांवर हल्लाबोल केला.

रामदास आठवले म्हणाले, मोदीसाहेब अकोल्यामध्ये येत आहेत. आत्ता.. मग का येणार नाही राज्यात महायुतीची सत्ता? पंतप्रधान मोदी आहेत पळणारा चित्ता, म्हणून तर गिरवत आहेत विकासाचा कित्ता, असे म्हणत त्यांनी पंतप्रधान मोदींचं स्वागत केलं.

**प्रकाश आंबेडकरांना पुन्हा एकत्र येण्याची साद**

यावेळी बोलताना त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांना एकत्र येण्याची साद घातली. तुकड्या-तुकड्या विखुरलेला समाज एकत्र करण्यासाठी प्रकाश आंबेडकरांनी आमच्याबरोबर यावं. त्यांनी पक्षाचं अध्यक्ष व्हावं. मी दुसरं कोणतही पद घ्यायला तयार आहे. मी त्यांना मोदींकडे घेऊन जाईल. आम्ही दोघंही एकत्र येऊ, सोबत मिळून थोडं-थोडं खाऊ, अशा मिश्किल भाष्य त्यांनी केलं.

## मतदानाच्या दिवशी राज्यातील सर्व आठवडी बाजार ठेवा बंद; उल्लंघन करणाऱ्यांवर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केल्यानुसार जिल्ह्यात दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. सर्व नोंदणीकृत मतदारांनी त्यांचा मतदानाचा हक्क बजवावा याकरिता जिल्ह्यात विविध उपक्रम राबवून मतदारांचा सहभाग वाढविण्याकरिता प्रशासनातर्फे प्रयत्न सुरू आहेत.



निवडणुकीची मतदान प्रक्रिया निर्भय, शांततामय वातावरणात व निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सदर प्रक्रियेदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदान साहित्यासह मतदान पथक दि. १९ नोव्हेंबर रोजी पोहोचणार असून, त्यांच्याजवळ ईव्हीएम, व्हीव्हीपॅट व इतर सर्व संवेदनशील साहित्य राहणार आहे.

या साहित्यास अपाय होऊ नये याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यात मुंबई पोलिस अधिनियम १९५१ क्रमांक २२ ची कलम ३७ (१) (३) अन्वये निर्बंध लागू करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यात फौजदारी प्रक्रिया संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मतदानाच्या कालावधीत विविध बाबींवर प्रतिबंध लागू करण्यात आले आहे. मात्र मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये ठिकठिकाणी आठवडी बाजार आयोजित करण्यात येत असतो. त्यामुळे मतदानाच्या दिवशी नागरिकांच्या गर्दीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्याअर्थी बाजार व जत्रा अधिनियम १८६२ चे कलम ५ (अ) व (क) अंतर्गत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये त्यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या दिवशी नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी २० नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व ठिकाणी आयोजित करण्यात येणारा आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश दिले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.




## संपादकीय ......

# आश्वासनांची खैरात

*सध्या महाराष्ट्रातील जनतेची खूप खूप मज्जा सुरू आहे. या निवडणुका झाल्याबरोबर राजकीय पक्षांनी दिलेली आश्वासने प्रत्यक्षात आणली, तर तुमच्यावर धनलक्ष्मीचा वर्षाव होणार आहे. लाडक्या बहिणींना सध्या पंधराशे मिळत आहेत. कुणी त्यांना २१०० रुपये देण्याचे वचन दिले आहे, तर कोणी त्यांना दर महिन्याला थेट पाच हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकर्यांना पैसे, बेरोजगारांना नोकर्या, गुळगुळीत रस्ते, वीज बिलात कपात, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवणे, मुलींना आणि मुलांना सरसकट शिक्षण फुकट अशा मिळणार्या आश्वासनांनी तुम्ही भारून गेलेला असाल. आता तुम्ही फक्त तुमच्या आवडत्या पक्षाला मतदान करायचे आहे. निकाल लागल्यावर अवघ्या महिन्याभरात हे सगळे लाभ पदरात पाडून घ्यायचे आहेत. याचा अर्थ २०२५ या वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये कोणीही गरीब राहणार नाही. कारण, त्याला काही खर्चच असणार नाही. धान्य मोफत, दर महिन्याला घरातील विविध व्यक्तींच्या नावे येणारी पेन्शन मोफत, लाडक्या बहिणीची ओवाळणी वेगळी, शेतकर्यांना कर्जमाफी हे सगळे असल्यानंतर कोणी गरीब कसे राहील बरे?*

*अपक्ष उमेदवारांनी तर वाटेल ते जाहीर करण्यास आणि देण्यास सुरुवात केलेली आहे. अपक्षाचा मुख्य प्रॉब्लेम हा असतो की, त्याचे चिन्ह अवघ्या १४ दिवसांत त्याला प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवायचे असते. एखाद्या अपक्षाला शिट्टी हे चिन्ह मिळाले असेल, तर शिट्टी प्रत्येकाला देणे अजिबात अशक्य नाही. एखाद्याला टीव्ही किंवा क्रिकेटची बॅट हे चिन्ह मिळाले असेल, तर त्याचे वाटप करणे निश्चितच खर्चिक असते. उदाहरणार्थ, प्रेशर कुकर हे चिन्ह मिळालेल्या अपक्षाने प्रत्येक घरामध्ये किमान एक प्रेशर कुकर द्यायचे ठरवले, तर प्रतिकुकर एक हजार रुपये खर्च त्याला येऊ शकतो. याशिवाय महत्त्वाचे हे की, मोठे राजकीय पक्ष धनलक्ष्मीचा वर्षाव करत असताना या उमेदवाराला नुसते प्रेशर कुकर देऊन कसे चालेल? प्रेशर कुकरमध्ये प्रत्येक मतदारामागे किमान दोन हजार रुपयांच्या नोटा टाकून ते कुकर व्यवस्थित बंद करून त्याला घरी नेऊन द्यावे लागेल. ही सगळी आश्वासने सर्वसाधारण राज्यातील सगळ्या जनतेसाठी आहेत. यातही लक्ष वेधून घेणारे काही उमेदवार असतात. ते जी आश्वासने देतात त्यांना तोड नसते. ग्रामीण भागामध्ये तरुण मुलांच्या लग्नाचा मोठाच प्रश्न उभा राहिला आहे. सर्व जाती -धर्मांमधील विवाह इच्छुक असणार्या तरुणांचे लग्न होणे अत्यंत कठीण झाले आहे. याची अनेक कारणे आहेत. विशेषत्वाने शेतकरी मुलाला कोणी मुलगी द्यायला तयार नाही. शिकलेल्या मुली ग्रामीण भागात जायला तयार नाहीत. कारणे असंख्य आहेत; परंतु प्रश्न गंभीर आहे, हे निश्चित! परळी विधानसभा मतदारसंघातील एका उमेदवाराने 'मला निवडून द्या, तुमचे लग्न लावून देतो' अशी सादच इच्छुक तरुणांना घातली आहे. राज्याचे जे काय व्हायचे ते होईल; परंतु आपले लग्न महत्त्वाचे आहे, असे या तरुणांना वाटत असणे साहजिक आहे. आपल्या मुलाचे लग्न होत नाही म्हणून त्याचे आई-वडील आजकाल खूप बेजार असतात. या चतूर उमेदवाराने तरुण मुलांना लग्न लावून देतो, असे आश्वासन देऊन या मुलांच्या आई-बाबांच्या काळजालाच हात घातला आहे, असे म्हणावे लागेल.*

# परदेशात भाजीपाला निर्यात करायचाय तर कशी हवी क्वालिटी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** - ताज्या भाज्या आणि त्यापासून प्रक्रिया केलेल्या पदार्थाच्या निर्यातीसाठी असणारी बाजारपेठ ही फार मोठी असून आज होत असलेल्या निर्यातीच्या पाचपट निर्यात करण्यास वाव आहे.

निर्यात होणाऱ्या भाज्यांमध्ये बटाटा, लसूण, कांदा, काकडी, हिरवी मिरची, मुळा, भोपळा, कारले, भेंडी, कोबी व फ्लॉवर यांचा समावेश होतो. भाज्या आयात करणाऱ्या देशांमध्ये युरोपातील देश, सौदी अरेबिया, कुवेत, इराक आणि आखाती देशांचा समावेश होतो.

भाजीपाला निर्यातीसाठी वेगवेगळ्या देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे मापदंड आहेत. कोणत्या देशाला आपण भाजीपाला निर्यात करणार आहे त्यानुसार प्रत्येक भाजीपाला पिकांच्या वाणांची

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

तसेच मापदंडाची निवड करावी.

निर्यातीसाठी विविध भाजीपाला पिकांची गुणवत्ता मानके

**१) भेंडी**- फळे नाजूक व रंग हिरवा, कोवळी लुसलुशीत ६ ते ७ सें.मी. लांब, साठवणीस योग्य, एकसारख्या आकाराची, डागविरहित, कोणत्याही प्रकारची इजा झालेली नसावी.

**२) मिरची**- गर्द हिरव्या रंगाची, तिखट, साठवणीस योग्य, फळाचा आकार एकसारखा असावा. मिरची ६ ते ७ सें.मी. लांब असावी.

**३) कारले**- रंग हिरवा, २५ ते ३० सें.मी. लांबीची असावी. मान बारीक असावी. हिरवी काटेरी असल्यास अधिक चांगले.

**४) गवार**- हिरव्या रंगाची ७ ते १० सें.मी. लांब असावी आणि कोवळी लुसलुशीत असावी. बी धरलेली असू नये.

**५) दुधी भोपळा**- २५ ते ३० सें.मी. लांबीचा, दंड गोलाकार, ड्रमच्या आकाराचा आणि फिकट हिरव्या रंगाचा असावा.

**६) टोमॅटो**- गोल, मध्यम




आकाराचे अगर अंडाकृती असावे. रंगाने लालसर, पूर्ण पिकण्याच्या अगोदरची अवस्था, तसेच वरची साल सुरकुतलेली नसावी तर तजेलदार आकर्षक असावी. टोमॅटोचे फळ डागविरहित असावे.

**७) कांदा**- दोन प्रकारचा निर्यात करू शकतो. एक मोठा कांदा आणि लहान कांदा. मोठ्या कांद्याचा आकार ४ ते ६ सें.मी. असावा. गडद ते फिकट लाल रंग, गोलाकार, तिखट आणि अगदी लहान कांद्यास म्हणजे २ ते ३ सें.मी. आकार लाल रंगाच्या गोलाकार कांद्यास खूप देशांतून मागणी आहे.

**८) लसूण**- गोलाकार, पांढऱ्या रंगाचा ५ सें.मी. व्यासापेक्षा मोठा आकार, मोठी पाकळी, एका गड्ड्यात १० ते १५ पाकळ्या असाव्यात.

**९) बटाटा**- ४.५ ते ६.० सें.मी. आकाराचा पांढरट अंडाकृती असावा. वरची साल आकर्षक असावी.

**१०) शेवगा**- शेंगा ५० ते ६० सें.मी. लांबीच्या व गरयुक्त असाव्यात तसेच एकसारख्या जाडीच्या आणि लांबीच्या असाव्यात.

**११) कलिंगड**- २ ते ३ किलो वजनाची असावीत. आतला गर लाल असावा. कलिंगड कमी बियांचे असावे.

# यंदा रबीच्या खर्चात बचत करायची आहे का? मग आजच माती परीक्षण करा

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**- रासायनिक खतांचा वारेमाप वापर वाढल्याने जमिनीचा पोत घसरत आहे. अशातच अनेक जण शेतजमिनीचे माती परीक्षण करतात. माती परीक्षणाद्वारे जमिनीत कोणत्या घटक द्रव्यांची कमतरता आहे, याबाबत माहिती मिळते.एकूणच जमिनीचे आरोग्य जाणून घेता येते. शेतकरी रासायनिक खते, कीटकनाशके आदींचा मोठ्या प्रमाणावर तर सेंद्रीय खते, शेणखते, हिरवळीची खते आदींचा वापर कमी प्रमाणात करतात. त्यामुळे शेती नापीक बनत आहे. जमिनीचा पोत खालावत असल्याने पिकेसुद्धा जोमाने वाढत नसल्याचा शेतकऱ्यांचा आतापर्यंतचा अनुभव आहे.

**माती परीक्षण कसे करावे?**

शेतजमिनीतून शेतकऱ्यांनी योग्य प्रकारे म्हणजेच तज्ज्ञांच्या सल्लयानुसार नमुना काढावा, म्हणजेच माती गोळा करून ती परीक्षणाला पाठवावी.

**माती परीक्षण कशासाठी?**

आपल्या शेतजमिनीत कोणते गुणदोष आहेत, जमिनीला कोणत्या घटक द्रव्यांची आवश्यकता आहे किंवा पिकानुसार शेतकऱ्याला कोणत्या खतांचा वापर करावा लागेल, या सर्व बाबी जाणून घेण्याकरिता माती




परीक्षण करावे लागते.

**किती वर्षांनंतर करायला हवे माती परीक्षण?**- जमिनीचे आरोग्य पोषक ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी तीन वर्षांनंतर एकदा माती परीक्षण करणे आवश्यक आहे. तेव्हाच जमिनीचा पोत टिकून राहतो. जमिनीतून विविध पिकांना आवश्यक घटक द्रव्येसुद्धा प्राप्त होतात.

**किती दिवसांत मिळतो तपासणी अहवाल?**-माती परीक्षण केल्यानंतर एका महिन्यात नियमानुसार अहवाल मिळतो. त्यानुसार जिल्ह्यातही ही कार्यवाही केली जात आहे. शेतकरीही याचा लाभ घेत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील माती परीक्षण कार्यालयाकडूनही शेतकऱ्यांना आवाहन केले जाते. त्यानुसार शेतकरीही याचा लाभ घेत आहे.

# म्हणजे काय... निवडून येणारच..!

*साहेब, नमस्कार! मला माहीत आहे की, सध्या तुम्ही प्रचारामध्ये खूप बिझी आहात. तुमच्या गाडीत तुमच्याबरोबर येऊन छोटीशी मुलाखत घेतली तर चालेल का..?*

*म्हणजे काय? जरुर घ्या. या, बसा गाडीत. चला करा सुरुवात.*




*या निवडणुकीमध्ये तुम्ही अपक्ष म्हणून उभे आहात आणि रात्रीचा दिवस करून तुमचा प्रचार सुरू आहे. जनमानसाचा कौल कसा आहे, असे तुम्हाला वाटते?*

*जनता सगळ्याच राजकीय पक्षांना कंटाळलेली आहे, हे तर दिसतेच आहे. खरे पाहता मी या निवडणुकीला उभे राहायला तयार नव्हतो. कारण, माझासुद्धा सगळ्या राजकीय पक्षांवरचा विश्वास उडालेला आहे. तिकीट देतो, देतो म्हणतात आणि ऐनवेळेला दिलेले तिकीट पण काढून घेतात. याला काही अर्थ नाही. राजकारणाच्या भानगडीत पडायचे नाही, असे ठरवून मी घरी बसलो होतो; पण लोक कसले गप्प बसू देतात? लोकांची सारखी रीघ लागली घरी. सगळ्यांचा एकच आग्रह. भाऊ, तुम्ही निवडणूक लढवणार नाही, तर मग आम्ही कोणाकडे पाहायचे? आपल्या मतदारसंघाचा विकास करायचा तर तुम्हीच असले पाहिजे. प्रत्येकाला नाही म्हणून सांगत होतो; पण आधी जनता आणि मग कार्यकर्ते प्रचंड संख्येने घरी यायला लागले आणि त्यांच्या आग्रहामुळे मला उभे राहावे लागले. शेवटी जनतेचा कोणी विचार करणार आहे की नाही? जनतेची सेवा आणि मतदारसंघाचा विकास करण्यासाठीच मी उभा आहे.*

*बरोबर आहे भाऊ! तुमचा जनसंपर्क दांडगा आहे आणि आर्थिक दृष्टीने पण तुम्ही सक्षम आहात याविषयी कुणाच्याच मनात शंका नाही; पण या निवडणुकीमध्ये अपक्ष उभे राहून तुम्ही मतदारसंघाचे समीकरण मात्र बदलून टाकले आहे, असे सगळे म्हणतात. हे तुम्हाला कसे काय शक्य झाले?*

*मतदारसंघाचे होईल ते होवो; परंतु तुम्हाला खासगीत म्हणून सांगतो. २० एकर जमिनीचा तुकडा विकला तेव्हा कुठे मला उभे राहता आले. स्वतःची जमीन विकून लोकांची सेवा करणारा कुणी अपक्ष उमेदवार तुम्हाला भेटला तर मला जरुर सांगा. आता तुम्ही विचारलेल्या प्रश्नाकडे वळतो. तुम्ही म्हणालात की, मी मतदारसंघाचे गणित बिघडवून टाकले. अहो कशाचे गणित आणि कशाचे काय? सगळेच राजकीय पक्ष बदमाश आणि बदनाम आहेत. लोक राजकीय पक्षांना कंटाळलेले आहेत. त्यांच्या सभा, त्यांचा प्रचार, नरेटिव्ह, प्रचंड पैसा या सगळ्यांचा जनतेला उबग आलेला आहे. जनतेला आपला विकास करणारा नेता पाहिजे. माझा स्वतःचा जनसंपर्क दांडगा आहे. गेली पाच वर्षे डोहाळ जेवणापासून ते अंत्यविधीपर्यंत मतदारसंघातील प्रत्येक कार्यक्रमाला मी स्वतः हजर आहे. मरणाला आणि तोरणाला माणसाने हजर असले पाहिजे, असे म्हणतात. अशा प्रत्येक ठिकाणी हा भाऊसाहेब स्वतः हजर असतो. दुसरे म्हणजे, मी जनतेसाठी २४ तास उपलब्ध आहे. पोलिस ठाण्यात कंप्लेंट झाली, तर जमानात घेण्यासाठी, कोणी आजारी पडला, तर त्याला दवाखान्यात नेण्यासाठी, कुणा पोराचा बर्थडे म्हणजे वाढदिवस असेल त्यासाठी मी हजर आहे. अगदी वाटेल त्या प्रसंगासाठी मी जनतेच्या दारात जातो. ही जनता मला विजयी मिरवणुकीमध्ये घेऊन जाईल, याची मला खात्री आहे.*




## आरोग्यासाठी गुणकारी ठरते गुलाब; जाणून घ्या फायदे

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**

गुलाबाचं फूल आपल्या सगळ्यांच्या परिचयाचं. सुंदर दिसणारं. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सार्यांचं मन मोहून टाकणारं. कुणाच्या शेतमळ्यात, कुणाच्या बागेत तर कुणाच्या घरच्या गॅलरीतल्या कुंडीत विराजमान होत दिमाखाने मिरवणारं हे लहानसं झुडूप. जरी आपल्या परिचयाचा असला गुलाब, तरी या नेहमी दिसणार्या फुलाचे गुणधर्म, त्याचे दैनंदिन जीवनात होऊ शकणारे उपयोग हे आपल्यातल्या बहुतेकांना ठाऊक नसतात.

खरंतर गुलाब बहुगुणी आहे, असं म्हणता येण्याइतपत पोषणतत्त्वं या फुलात एकवटली आहेत. गुलाब मानवी शरीराला थंडावा देण्याइतपत गुणकारी आहे. हृदयासाठी बलकारक आहे. गुलाबाचं फूल पचनाला हलकं आणि रक्त शुद्ध करणारं आहे, असं मानलं जातं. त्याच्या मधुर रसात रक्तातील उष्णता कमी करण्याची क्षमता आहे.

जेवल्यावर पोट जड होऊन अनेकांना गॅस होतो, आंबट ढेकर येतात, छातीमध्ये जळजळतं, आग आग होते. काहींचे हातापायाचे तळवे जळजळल्यासारखे होतात. त्यांच्यासाठी गुलाब उपकारक मानला जातो. गुलाबापासून तयार केला जाणारा गुलकंद आपल्यापैकी अनेकांच्या परिचयाचा आहे. गुलकंद जर औषध म्हणून वापरायचा असेल तर हल्ली बाजारात तयार गुलकंद बर्याच ठिकाणी उपलब्ध असतो. अर्थात, गुलकंद बनवता येऊ शकतो.

**गुलकंद कसा बनवतात**

घरच्या घरी गुलकंद बनवण्यासाठी सगळ्यात आधी फुलापासून गुलाब पाकळ्या सोडवून मोकळ्या करा.

पाकळ्यांच्या दुप्पट साखर घ्या आणि एकत्र करून स्वच्छ व सुक्या बरणीत भरा.



बरणी उन्हात ठेवा. एक-दोन महिन्यापर्यंत ती उन्हात तशीच राहू द्या आणि नंतर वापरायला काढा.

गुलकंद शक्यतो चैत्र महिन्यात बनवा.

गुलकंदाचे फायदे

असा घरच्या घरी बनवलेला गुलकंद शरीरासाठी विशेष उपयुक्त ठरू शकतो.

मुख्य म्हणजे गुलकंदामुळे पोट साफ होण्यास मदत होते.

कारण, तो एखाद्या रेचकाप्रमाणे काम करतो.

रक्तदोष, खरूज किंवा खाज गुलकंदामुळे दूर होऊ शकते.

कांजण्या किंवा गोवर आल्यानंतर शरीरातील उष्णता बाहेर काढण्यासाठी गुलकंद फायदेशीर मानला जातो.

भूक लागण्यासाठी आणि रक्तदाब नियमित व संतुलित ठेवण्यासाठीही गुलकंदाचं सेवन उपयुक्तठरतं.

# शहरात भव्य मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती**-

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ च्या अनुषंगाने व्यापक मतदान जनजागृती करीता प्रशासना बरोबर विविध स्वयंसेवा संस्था, व्यापारी, व्यावसायीक, औद्योगिक, शिक्षक, कर्मचा-यांची व इतर संघटना पुढे येवुन आपला सहभाग नोंदविण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारीत निश्चित वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून मा.जिल्हाधिकारी अमरावती, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व महानगरपालिका अमरावती मार्फत अमरावती शहरातुन भव्य मतदान जनजागृती रॅली दिनांक ११/११/२०२४ दुपारी ४.०० वाजता नेहरु मैदान पासुन जिल्हा स्टेडीयम अमरावती पर्यंत आयोजीत केलेली आहे.

सदर मतदान जनजागृती रॅलीची सुरुवात नेहरु मैदान येथुन होणार असून राजकमल चौक मार्गक्रमण करत जिल्हा स्टेडीयम अमरावती येथे रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी सहभागी होवून मतदान जनजागृती करीता सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले



आहे.

महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी नागरीकांना आवाहन केले की, प्रत्येक नागरीकाने आपला मतदानाचा अधिकार बजवावा. येणा-या २० तारखेला नागरीकांनी उस्फुर्तपणे मतदान करुन निवडणुकीत आपला सहभाग नोंदवावा. विधानसभेचे दूत बनून मनपा क्षेत्रातील मतदारांना मतदानास येण्याचा आग्रह धरावा. अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात मतदान होण्याकरीता सर्वांनी मिळून प्रयत्न करावे. देश घडविण्यासाठी प्रत्येकाने मतदान करणे गरजेचे आहे. विधानसभेत प्रत्येक मताला महत्त्व असल्याने कोणत्याही प्रलोभनाला आणि दबावाला बळी न पडता नागरिकांनी मतदान करावे असे आवाहनही मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले.

# सोयाबीनचा खर्च वाढला अन् उत्पादन घटले; शेतकऱ्यांना किमान सहा हजार रुपये दराची अपेक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** - यावर्षी सोयाबीनचे प्रतिएकर उत्पादन तीन ते चार क्विंटल आणि खर्च किमान १६,४०० रुपये आहे. दर दबावात असल्याने शेतकऱ्यांना सोयाबीन विक्रीतून १२ ते १६ हजार रुपये मिळत असल्याने ४०० ते ४ हजार रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. सोयाबीनला किमान सहा हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत असताना सरकार यावर काहीच उपाययोजना करायला तयार नाही.

वाढलेले कृषी निविष्ठा व मजुरीचे दर, रोग व किडींचे व्यवस्थापन, सततचा पाऊस व प्रतिकूल हवामान यामुळे सोयाबीनचा उत्पादन खर्च वाढला असून, उत्पादन घटले आहे. सरकारने एमएसपी दराने खरेदी सुरू न केल्याने शेतकऱ्यांना सरासरी चार हजार रुपये दराने सोयाबीन विकावे लागत आहे.या संस्थांचे अधिकारी व कर्मचारी सोयाबीन खरेदीच्यावेळी शेतकऱ्यांना त्रास देतात व चुकारे देण्यास बराच




विलंब करतात.

कांदा खरेदी प्रकरणात नाफेड व एनसीसीएफ या दोन्ही संस्थांचा भ्रष्ट कारभार उघड झाला आहे. सरकारने या संस्थांना ९० दिवसांत १३ लाख टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट्य दिले होते. त्यांना १५ ऑक्टोबरपासून खरेदी सुरू करणे अनिवार्य होते. त्यांनी पहिल्या ३० दिवसांत सोयाबीनचा दाणाही खरेदी केला नाही. त्यांची कार्यप्रणाली व पायाभूत सुविधा विचारात घेता उर्वरित ६० दिवसांत ते किती सोयाबीन खरेदी करतील, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**सोयाबीन दराचे अर्थशास्त्र**

सोयाबीन हे तेलबिया वर्गातील पीक नाही. एक क्विंटल सोयाबीनपासून केवळ १२ ते १३ किलो आणि ८५ ते ८७ किलो ढेप मिळते. त्यामुळे सोयाबीनचे दर तेलाऐवजी ढेपेच्या दरावर ठरतात. जगात नॉन जीएम सोयाबीनचे उत्पादन भारताव्यतिरिक्त कुठेही घेतले जात नाही. जीएम सोयाबीनचे उत्पादन प्रतिहेक्टर किमान ३२ ते ३५ क्विंटल असल्याने जागतिक बाजारात सोया ढेपेचे दर भारतापेक्षा कमी आहेत. त्यामुळे भारतीय सोया ढेपेची निर्यात थांबली असून, सोयाबीनचे दर दबावात आहेत.

**जीएम सोया ढेप आयात**

केंद्र सरकारने जीएम पिकांच्या उत्पादनावर बंदी घातली असून, जीएम सोया तेल व ढेपेच्या आयातीला अधिकृत परवानगी दिली आहे. सोया तेलाच्या आयातीवर शुल्क लावले असले तरी ढेप मात्र शुल्क मुक्त आयात केली जाते. केंद्र सरकारने जीएम सोया ढेपेच्या आयातीवर किमान ७० टक्के आयात शुल्क लावल्यास तसेच नॉन जीएम सोया ढेपेच्या निर्यातीला सबसिडी दिल्यास सोयाबीनला सहा हजार रुपये दर मिळू शकतो. उत्पादन वाढविण्यासाठी जीएम पिकांना परवानगी देणे आवश्यक आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वोटर स्लिप चे नागरिकांना वाटप

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली विविध मतदान केंद्राची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती,**–विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते आज नागरिकांना वोटर स्लिप व गुलाबपुष्प देवून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी 'आम्ही मतदानाचा हक्क निश्चित बजावू व राष्ट्रीय कार्यात स्वयंस्फूर्तीने सहभाग घेवू', अशी ग्वाही दिली .

जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी अमरावती तसेच बडनेरा येथील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील व्यवस्थेचा आढावा घेतला. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील, कल्पना बारवकर, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेत सर्व अधिकारी–कर्मचाऱ्यांनी योग्य समन्वय राखावा. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांवर सर्व मूलभूत सोयी–सुविधा उपलब्ध असल्याची खात्री उपविभागीय अधिकारी यांनी करून घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी





यावेळी दिले . मतदान केंद्रांवर दिव्यांगांसाठी व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था, आवश्यक असेल तिथे पेंडॉल, स्वच्छतागृहे या मूलभूत सोयी–सुविधा असणे आवश्यक आहे. मतदान करतेवेळी त्या कक्षामध्ये चांगला प्रकाशझोत असावा. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रा वरील ईव्हीएम मशीन, मतदार संख्या आणि होणाऱ्या मतदानाच्या टक्केवारी बाबत तात्काळ अद्ययावत माहिती अपलोड करावी, असेही ते यावेळी म्हणाले.जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी जुनी वस्ती, बडनेरा येथील अमरावती मनपा उर्दू प्राथमिक कन्या शाळा क्रमांक –३, साईनगर येथील साईबाबा विद्यालय, हलिमा उर्दू शाळा, बिस्मिल्ला नगर येथील मनपा उर्दू प्राथमिक शाळा, जमील कॉलनी येथील मनपा उर्दू हायस्कूल, छत्रसालगंज येथील मनपा हिंदी प्राथमिक शाळा क्रमांक –२, वलगाव रोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विद्योचित केडेमीक माध्यमिक शाळा या मतदान केंद्रांना भेट देऊन तेथे व्यवस्थेची पाहणी केली. 'मी मतदान करणारच' या सेल्फी पॉईंटवर जिल्हाधिकारी तसेच सर्व मान्यवर यांनी सेल्फी काढून मतदानाचा हक्क बजावण्याबाबत नागरिकांना आवाहन केले. पोलीस आयुक्त श्री. रेड्डी, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीमती मोहपात्र, मनपा आयुक्त श्री कलंत्रे यांनीही यावेळी नागरिकांना मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, आम्हीही करतो, तुम्हीही मतदान करा, असा संदेश दिला. यावेळी नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावण्याबाबत प्रतिज्ञा घेतली. चांदणी चौक ते राजकमल चौक या मार्गाने मतदानाबाबत जनजागृती करणारी रॅली यावेळी काढण्यात आली.


### सीमावर्ती भागात तपासणी नाके धडक कारवाईचा परिणाम

## नाकांबदीने दारुतस्करांची 'उतरवली', शौकीन म्हणतात, 'मोहा'ची तरी द्या!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – निवडणुकीच्या आचासंहितेमुळे जिल्ह्याच्या सीमावर्ती पुलांवर पोलिस चौक्या उभारण्यात आल्या आहेत, तसेच प्रत्येक ठाण्याच्या पोलिसांनी दारू वाहतूक व विक्रेत्यांविरोधात धडक कारवाई सुरु केल्याने शहरासह, खुलेआम दारू विक्री करणाऱ्या गावांमध्ये दारूची टंचाई निर्माण झाली आहे. ज्यांच्याकडे दारू आहे ती दुप्पट दाने विकली जात आहे.

अमरावती जिल्ह्यात प्रामुख्याने मध्यप्रदेश, व आजू बाजूच्या जिल्ह्यांमधून दारूची वाहतूक होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी



सीमावर्ती भागात असलेल्या पुलांवर पोलिस चौक्या उभारल्या आहेत. त्यामुळे मोठ्या वाहनाने दारू आणणे कठीण झाले असल्यामुळे अवेध दारू तस्करांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.अमरावती जिल्ह्यात अनेक अवेध दारू विक्रेते आहेत.त्यांच्याकडे आता दारूचा पुरवठा कमी होत आहे. काही दारूचे वाहतूकदार पोलिसांची नजर चुकवून दारू आणत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात दारू मिळत आहे. मात्र, पुरवठा कमी झाला आहे.

### ऐन दिवाळीत दर कडाडले

ऐन दिवाळीत अमरावती शहरासह तालुक्यात देशी व विदेशी दारूची टंचाई निर्माण झाल्याने दाम दुप्पट दराने दारू विकल्या जात होती. तरीही देशी किवा विदेशी दारू मिळत नसल्याने शेवटचा पर्याय म्हणून दारू शौकीन मोहफुलाच्या दारूवर ताव मारून शौक भागवत होते.–

## संनियंत्रण पथकाकडून उमेदवारांच्या लेख्यांची प्रथम तपासणी पूर्ण




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** –

विधानसभा निवडणुकीच्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांच्या खर्चाची तपासणी करण्यात आली. यानंतर पहिली तपासणी ११ नोव्हेंबर तर दुसरी तपासणी १५ नोवव्हेंबर रोजी होणार आहे.विधानसभा सार्वत्रिक निवडणुक – २०२४ च्या अनुषंगाने अमरावती विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणूक होणार असून निवडणुका शांततापूर्ण, भयमुक्त व पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी निवडणुक आयोगाने आदर्श आचार संहिता लागू केलेली आहे. उमेदवारांच्या खर्चावर देखरेख ठेवण्याकरीता भारत निवडणुक आयोगाने खर्च निरीक्षक उमा माहेस्वरी यांची नियुक्ती केली आहे. खर्च निरीक्षक यांनी उमेदवरांच्या लेख्याची तपासणी करण्याकरीता तीन तारखा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. त्यातील पहिली तपासणी खर्च निरीक्षक उमा माहेस्वरी यांचे मार्गदर्शनाखाली दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी नवीन तहसिल इमारत, दर्यापूर येथील सभागृहात पार पडली.

उमेदवारांच्या लेख्याच्या तपासणीवेळी एकुण १६ उमेदवारांपैकी १५ उमेदवार, प्रतिनिधी उपस्थित होते. अनुपस्थित एका उमेदवारास ४८ तासाचे आत निवडणुक खर्चाचे लेखे निवडणुक संनियंत्रण कक्ष, नवीन तहसिल इमारत, दर्यापूर येथे सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आली. विहित मुदतीत खर्च सादर न केल्यास कायद्यान्वये तक्रार दाखल करण्यात येईल. तसेच वाहने, सभा इत्यादी साठी देण्यात आलेल्या सर्व परवानग्या तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, असे कळविण्यात आले आहे. या खर्च तपासणीचे वेळी उपस्थित १५ उमेदवार, प्रतिनिधी यांनी त्यांच्या खर्च नोंदवहीत नोंदविलेला खर्च व खर्च सनियंत्रण पथकाद्वारे नोंदविण्यात आलेला खर्च यात असलेली तफावत उमेदवारांनी मान्य करून प्रथम तपासणीत सदर पंधराही उमेदवारांचे खर्च लेख्याचे ताळमेळ घेण्यात आला.उमेदवरांच्या लेख्याची दुसरी व तिसरी तपासणी अनुक्रमे दि. ११ व १५ नोव्हेंबर २०२४ रोजी नवीन तहसिल इमारत, दर्यापूर येथील सभागृहात आयोजिली आहे, संबंधितांनी याची नोंद घेण्याच्या आवाहन करण्यात आले आहे.

## आकाशात पहायला मिळणार चार दिवस आतिषबाजी

## होणार मोठ्या प्रमाणात उल्कावर्षाव

### १७ ते २० नोव्हेंबरदरम्यान सिंह तारकासमुहातून उल्कावर्षाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** १७ ते २० नोव्हेंबरदरम्यान सिंह तारकासमुहातून मोठ्या प्रमाणात उल्कावर्षाव होणार आहे. पहाटेच्या सुमारास याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे आकाशात चार दिवस आतषबाजी पहायला मिळणार आहे.

उल्कावर्षावाची तिव्रता, निश्चित तारीख, वेळ या गोष्टी खात्री सांगता येत नाही. घराबाहेर आणि भराभर उल्का पडतांना दिसल्या अशी अवास्तव कल्पना कोणी करु नये. उल्काचे निरीक्षण आणि त्याच्या नोंदीची खगोल जगतात खूप गरज आहे.

या उल्का वर्षावाला 'लिओनिड्स' हे नाव आहे. अंधाऱ्या रात्री आकाशाचे निरीक्षण करीत असतांना एकाद्यावेळी क्षणार्धात एकादी प्रकाशरेषा चमकून जाताना आपणास दिसते या घटनेस तारा तुटणे असे म्हणतात. ही एक खगोलीय घटना आहे एखाद्यावेळी उल्का आपल्याला पडताना दिसते, या संदर्भात लोकांच्या अंधश्रद्धा आहे. परंतू अशा अंधश्रद्धेला खगोलशास्त्रात कोठेही आधार नाही.



ि स ह तारकासमुहातून होणारा हा उल्कावर्षाव 'टेम्पलटटल' या धूमकेतूच्या अवशेषामुळे होतो व हा धूमकेतू ३३ वर्षांनी सुर्याला भेट देतो. सर्व खगोलप्रेमिंनी उल्का वर्षावाचे विलोभनीय दृष्य पाहावे, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौसी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.

काय आहे उल्कावर्षाव?

धूमकेतू सूर्याला प्रदक्षिणा घालून जात असतांना त्यातील काही भाग मोकळा होतो, धुमकेतूने मागे टाकलेले ते अवशेष असतात. या उल्का एकाद्या तारका समुहातून येत आहेत, असे वाटते. तासाला ६० किंवा त्यापेक्षा जास्त उल्का आकाशातील एकाद्या भागातून पडत असतील तर त्यास उल्का वर्षाव म्हणतात. काही वेळा गतिमान उल्का पृथ्वीच्या वातावरणातून खाली येताना त्या घनरुप अवस्थेत पृथ्वीवर येतात, त्यास 'अशणी' म्हणतात, बाह्य अवकाशातील वस्तूचे नमूने या अशणीमुळे मिळतात.

## स्थानिक गुन्हे शाखेने पकडली ९.३८ लाखांची रोकड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती :–** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धामणगाव रेल्वे व चांदुररेल्वे येथून एकुण ९ लाख ३८ हजार रुपये रोख रक्कम जप्त केली. ८ नोव्हेंबर रोजी या दोन्ही कारवाया करण्यात आल्या.स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नियमित गस्तीवर असतांना त्यांनी धामणगाव रेल्वे येथे एका इसमाची झाडाझडती घेतली असता त्याच्याकडे ५ लाख रुपये मिळून आले. त्याने समाधान कारक उत्तर न दिल्याने ती रक्कम जप्त करण्यात आली. संबंधित व्यक्ती हा धामणगाव रेल्वे येथील रहिवासी आहे. तर दुसऱ्या कारवाईत चांदूर रेल्वे येथे एका इसमाकडे ४.३८ लाख रुपये दिसून आले. त्याने देखील रोख रकमेबाबत




समाधानकारक उत्तर न दिल्याने ती रक्कम जप्त करण्यात आली आहे. तो व्यक्ती अमरावतीच्या मसानगंज येथील रहिवासी आहे. मिळालेल्या दोन्ही व्यक्तींकडे रोख रक्कमेसंबंधात असणारे पुरावे तपासून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात उपनिरिक्षक मो. तसलिम यांच्या पथकाने ही कारवाई केली. यापुर्वी केलेल्या चार कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने २७.१६ लाख रुपये रोख रक्कम जप्त केली.

## हमालपुऱ्यातील ऑनलाइन गेम सेंटर 'ट्रॅप'


### चौघांविरुद्ध गुन्हा दाखलराजापेठ पोलिसांची कारवाई

### : २१ हजारांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** स्थानिक हमालपुरा येथे विनापरवाना सुरू असलेल्या एका ऑनलाइन गेम सेंटरवर राजापेठ पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत २१ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ७ नोव्हेंबर सायंकाळी टाकलेल्या या धाडीप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

हमालपुरा येथे विनापरवाना व अवैधरीत्या सुरू असलेल्या ऑनलाइन गेम सेंटरमध्ये काही जण लोकांकडून पैसे घेऊन हार–जीतचा खेळ खेळत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या राजापेठ पोलिसांना मिळाली. त्या आधारे पोलिसांनी त्या गेम सेंटरवर धाड टाकली. यावेळी तेथे उपस्थित असलेल्यांची चौकशी केल्यावर त्यांनी आपली नावे ओम राजेंद्र पराळे (३८, रा. यवतमाळ), विक्की राजू चवरे (३०, रा. हरिदास पेठ, बडनेरा) व ऐफाज अली वल्द हैदर अली (२८, रा. ताजनगर, अमरावती) अशी सांगितली. त्यांना गेम सेंटरच्या मालकाबाबत विचारणा केली असता त्यांनी सेंटरचा मालक आकाश बबनराव पाटील (रा. पार्वतीनगर क्रमांक



३, अमरावती) हा असल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याची चौकशी केली. त्यावर त्याने आपल्याजवळ कोणतीही शासकीय परवानगी नसल्याचे पोलिसांना सांगितले. त्यामुळे पोलिसांनी तेथील २१ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चारही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. ही कारवाई राजापेठचे ठाणेदार पुनित कुलट यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, डीबी प्रमुख अंमलदार मनीष करपे, पंकज खटे, रवी लिखितकर, गनराज राऊत, सागर भजगवरे यांनी केली.

## मध्यप्रदेशातून येणा–या अवैध गावठी हातभट्टी दारुवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती,–** विभागीय उपआयुक्त अर्जुन ओहोळ, राज्य उत्पादन शुल्क अमरावती विभाग व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क श्रीमती ज्ञानेश्वरी आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श आचारसंहीता विधानसभा निवडणुक – २०२४च्या पार्श्वभूमीवर विशेष मोहिमेत भरारी पथक यांनी नुकतीच धारूळ ते चिंचोली रोडवर, बस थांब्यांच्या बाजुला ता. मोशी येथे एक बजाज कंपनीची डिस्ककवर दुचाकी मोटरसायकल, (क्रमांक एमएच २७ ऐपी १३९९ ) दुचाकीच्या मागील सीटवर एका नॉयलानच्या पोत्यात दोरीच्या साहाय्याने बांधलेला रबरी ट्युबमध्ये अंदाजे ७० लीटर गावठी हातभट्टी दारु भरलेली होती. कारवाई दरम्यान दुचाकी वाहनासह गावठी हातभट्टी दारुची अंदाजे किंमत ५५ हजार २०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी इसम रामकिशन झनकराम धुर्वे, वय ३५ वर्ष, रा. तरोडा ता. मोर्शी यांच्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायदयानुसार गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच धामणगाव गढ़ी ते धारणी रोडवर वझ्झर धरणाजवळ ता. अचलपुर येथे एक दुचाकी मोटरसायकल ( क्रमांक एमएच २७ / ७१५४) या दुचाकीच्या मागील सीटवर एका नॉयलानच्या पोत्यात दोरीच्या साहाय्याने बांधलेल्या ६० लीटर क्षमतेच्या एक रबरी ट्युब व



३० लीटर क्षमतेचे दोन रबरी ट्युबमध्ये अंदाजे १२० लीटर गावठी हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. कारवाई दरम्यान दुचाकी वाहनासह गावठी हातभट्टी दारुची अंदाजे कींमत ५२ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी आरोपी इसम आकाश गणेश उईके, वय २८ वर्ष, रा. गौलान मोहल्ला खोमई ता. भैसदेही, जि. बैतुल यांच्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायदयानुसार गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई दुय्यम निरीक्षक एस.पी. वायाळ, पी. पी. देशमुख, एस. एस. पेंढारकर, एस टी. जाधव, पी. आर. भोरे, जवान के. एम. मातकर, व्ही. बी. पारखी, डी. डी. मानकर यांचे संयुक्त पथकाने केली. या कारवाईचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस. पी. वायाळ व पी. पी. देशमुख भरारी पथक हे करीत आहेत.



# महिलांबाबत अपमानास्पद वक्तव्यावर निवडणूक आयोग ॲक्शमोडवर

## अधिकाऱ्यांना दिल्या कारवाईच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मुंबई** – विधानसभा निवडणुकीत महिला उमेदवारांविरोधात अशोभनीय वक्तव्य केल्याबाबत निवडणूक आयोगाने कडक भूमिका घेतली आहे. याशिवाय महिलांबाबत आक्षेपार्ह टीका करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

याबाबत निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांना सल्ला सूचना दिल्या आहेत.निवडणूक प्रचारादरम्यान तसेच सार्वजनिक जीवनात महिलांबद्दल अपमानास्पद आणि असभ्य टिप्पणी करणे टाळावे, अशा सूचना दिल्या आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तयारीसंदर्भात राज्यभरातील जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलिस अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत आयोगाने शुक्रवारी हे निर्देश दिले आहेत.

या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालकही उपस्थित होते. निवडणूक जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातून ज्या प्रकारच्या तक्रारी येत आहेत त्या त्रासदायक असल्याचे आयोगाने म्हटले आहे. यामध्ये महिला उमेदवारांबद्दल असभ्य आणि आक्षेपार्ह टिप्पणी केली जात आहे.

अशा प्रकरणांवर बारकाईने लक्ष ठेवून कठोर कारवाई करण्याचे निर्देश आयोगाने अधिकाऱ्यांना दिले. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार शायना एनसी यांच्या विरोधात काही दिवसापूर्वी केलेल्या टीके संदर्भात निवडणूक आयोगाची कठोरता दिसून येत आहे. सावंत यांनी केलेल्या टीकेवर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया आल्या होत्या. भाजपनेही त्यांना घेरले आणि महिलांबाबत अयोग्य टिप्पणी करणाऱ्यांना जनता धडा शिकवेल, असं प्रत्युत्तर दिले आहे. दरम्यान, शिवसेना ठाकरे गट खासदार संजय राऊत यांचे भाऊ सुनील राऊत यांनी शिवसेनेच्या शिंदे गटाच्या उमेदवाराबाबत आक्षेपार्ह टीका केल्याचे समोर आले होते. या विधानानंतरही आरोप–प्रत्यारोप झाले होते.



लोकसभा निवडणुकीच्या वेळीही महिलांबाबत आक्षेपार्ह टीकेबाबत आयोगाने कठोर भूमिका दाखवली होती, त्यांनी कंगना राणौत यांना नोटीसही बजावली होती आणि काँग्रेस नेत्या सुप्रिया श्रीनेट यांनी केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीवर त्यांच्याकडून उत्तर मागितले होते.

# विरोधकांच्या डोक्याचे नट कसण्यासाठी मी राणांचा पाना वापरणार – देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – महायुती सरकारने लाडकी बहीण योजना आणली, त्यावेळी महाविकास आघाडीकडून आमच्यावर टीका करण्यात आली. ही योजना फसवी असल्याचे सांगण्यात आले. मात्र, राज्यातील अडीच कोटी महिला या योजनेच्या लाभार्थी ठरल्या आहेत. विरोधक या योजनेच्या विरोधात उच्च न्यायालयात गेले, पण न्यायालयाने देखील योजना बंद करण्यास नकार दिला. महाविकास आघाडीचे नेते लाडकी बहीण योजनेच्या विरोधात आहेत. त्यांच्या डोक्याचे नट कसण्याची गरज आहे, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे बोलताना लगावला.

बडनेराचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या प्रचारार्थ बडनेरा मार्गावर आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. रवी राणा यांचे निवडणूक चिन्ह पाना आहे. हा संदर्भ देत देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर टीका केली. देवेंद्र फडणवीस म्हणाले, लाडकी बहीण योजना राबवून महायुती सरकार पैशांचा चुराडा करीत असल्याचे सांगून महाविकास आघाडीच्या सावत्र भावांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. पण, आम्ही योजना बंद होऊ दिली नाही. भविष्यात देखील ही योजना बंद होणार नाही. या योजनेत महिलांना दरमहा पंधराशे रुपये भावाकडून ओवाळणी म्हणून मिळते. महायुतीची सत्ता पुन्हा आल्यानंतर महिलांच्या खात्यात दरमहा २१०० रुपये जमा होणार आहेत. महाविकास आघाडीचे नेते षडयंत्र करीत राहतील, पण आम्ही लोकहिताच्या योजना बंद पडू देणार नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या डोक्याचे नट कसण्यासाठी रवी राणांचा पाना मी वापरणार आहे, असा टोला फडणवीस यांनी लगावला.–






## सांत्वनपर भेट...

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी माजी राज्यमंत्री भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या अमरावती येथील निवासस्थानी सांत्वनपर भेट दिली.यावेळी पोटे पाटील कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी असल्याचे मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले यावेळी मान्यवर मंडळी उपस्थित होते.–



# वाहतूक शाखेच्या 'त्या' ८ पोलिसांना शोकॉज'

## खुलासा आल्यावर कारवाई

**'विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती**

वाहतूक शाखेचे आठ कर्मचारी नेमलेले पॉइंट सोडून शहराबाहेरील मार्गावर कर्तव्य बजावत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याच निदर्शनास आले होते. अशा आठ वाहतूक पोलिसांना पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर 'शो कॉज' यांनी नोटीस बजावली आहे. यावर संबंधित कर्मचाऱ्यांकडून खुलासा अद्याप आला नाही. खुलासा आल्यानंतर संबंधितांविरुद्ध कारवाई अटळ आहे. शहरातील मुख्य मार्गांसह अनेक मुख्य चौकात मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. वाहतूक नियमन योग्य पद्धतीने व्हावेम्हणूनच अमरावती शहरात वाहतूक शाखेचे दोन युनिट आहे. मात्र असे असले तरीही मुख्य चौक व मार्गावर अनेकदा वाहतूकीची कोंडी दिसते. मनुष्यबळाचा अभाव असल्यामुळे ही कोंडी होत असल्याचे बरेचदा वाहतूक पोलिस अधिकारी सांगत असतात.वास्तविक वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दररोज सकाळी वाहतूक शाखेतून अंमलदारांना पॉइंट नेमून दिलेले असतात. दिवाळीच्या चार दिवसांपूर्वी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेडी यांनी पाहणी केली असता चार कर्मचारी शहराबाहेर नागपूर हायवेवर दिसले. तसेच दुसऱ्या दिवशी अन्य चार कर्मचारी इतरत्र 'कर्तव्य' बजावताना वाहतूक शाखेचेच एसीपी संजय खताळे यांना दिसले. त्यामुळे या आठही पोलिस अंमलदारांचे कसुरी अहवाल पोलिस उपायुक्त (मुख्यालय) कल्पना बारवकर यांच्याकडे पोहोचले होते. त्यानुसार, त्यांनी आठही अंमलदारांना 'शो कॉज' बजावली.

### कारवाई होणारच

आम्ही त्या आठही वाहतूक पोलिस अंमलदारांना 'शो कॉज' पाठवली आहे. त्यावर संबंधित अंमलदारांकडून लेखी उत्तर आले नाही. त्यांच्याकडून उत्तरआल्यानंतर पुढील कारवाई होईल. कल्पना बारवकर, पोलिस उपायुक्त (मुख्यालय).

सुगंधीत तंबाखू प्रकरणातील

# सोनू मास्टरमाईंड पोलिसांच्या रडारवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती**

राज्यात गुटखा बंदी झाली असतानाही जिल्ह्यातील प्रत्येक पानटपरीवर गुटखा आणि सुगंधी तंबाखूची खुलेआम विक्री करण्यात येत आहे. त्यासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुटख्याची तस्करी करण्यात येत असून, दोन दिवसापूर्वी पाच लाखाचा गुटखा पकडून एलसीबीकाने सहा जणांना ताब्यात घेतले होते. त्या सहाही जणांनी शुक्रवारी कारागृहात रवानगी करण्यात आली असून मास्टरमाईंड सोनू नामक व्यक्तीचा आता शोध सुरू करण्यात आला आहे.

यापूर्वी ललीत विजय जाधवानी (वय – २८) वर्ष रा. बालाजी सोसायटी, रोहीत प्रकाश हमनानी (वय २५) वर्ष, सोनूचंद्रसेन चुंगानी (वय ३२) वर्ष दोघेही रा. नंदुरकर शाळे समोर, मनोज सुभाषचंद्र मुथा (वय ४९) वर्ष रा. धारीवाल ग्रीन सोसायटी आणि मिथून दामोधर जीवतोडे (वय ३५) वर्ष रा. नविन वस्ती तहसिलसमोर, राळेगाव यांच्यासह अन्य एकाचा अटक करण्यात आली होती. शहरातील पांढरकवडा मार्गावरील एका ट्रान्सपोर्ट परिसरात एलसीबी पथकाने पाच लाखाचा सुगंधीत तंबाखू जप्त केला होता. या प्रकरणात नागपुरातील सोनू नामक मास्टरमाईंडचे नाव पुढे येत असून त्याचा शोध आता एलसीबी पथक घेत आहे. यापूर्वीही वणी, पांढरकवडा या ठिकाणी करण्यात आलेल्या कारवायांमध्ये लाखो रुपये किमतीचा गुटखा, पान मसाला आणि सुगंधित तंबाखू पोलिसांनी जप्त केला.

# शहरात तपासणी, महामार्ग मोकळे शेतकरी, व्यापाऱ्यांवर कारवाई:

## स्थिर तपासणी नाक्याचा कारभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** निवडणुकी दरम्यान पैशाचा वापर करुन मतदान होऊ नये यासाठी स्थिर तपासणी नाके उभारण्यात आले आहे. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. या कारवाईत मात्र राजकीय पक्षांचा किंवा उमेदवारांचा पैसा कधीच अडकला नाही. शहरातच ही कारवाई होत असल्याने सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, शेतकरी यांचा पैसा अडकून पडत आहे. दैनंदिन व्यवहाराची रक्कम बँकेत नेतानाही अडचणी येत आहेत.आदर्श आचारसंहितेत मतदान प्रक्रियाही कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता व्हावी हा उद्देश आहे. त्यासाठी स्थिर तपासणी नाक्यावर वाहनांची तपासणी, रोख रकमेचे व्यवहार यावर निर्बंध घातले जातात. ५० हजारांपेक्षा अधिकची रक्कम असल्यास त्याबाबतचे कागदोपत्री पुरावे सोबत ठेवावे लागतात. शहराबाहेर जात असल्यास ही खबरदारी घेतली जाते. गेल्या काही दिवसात शहरातच तपासणी नाके लावून रोख जप्तीचीकारवाई केली जात आहे. यामुळे दैनंदिन व्यवहार करणारे अडचणीत आले आहे. कधी व्यावसायिक, बँकेतील कर्मचारी, शेतकरी वर्ग यांना रोख नेतानाही उत्तरे द्यावी लागत आहे.



# 'उर्ध्व वर्धा'तून रब्बी हंगामात सिंचनासाठी पाचचेळा पाणी

## १० नोव्हेंबरपूर्वी अर्ज करण्याचे शेतकऱ्यांना केले आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – ऊर्ध्व वर्धा प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी पाणीसाठा उपलब्ध असून पाचवेळा पाणी देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी लाभक्षेत्रातील शेतकरी बांधवांनी १० नोव्हेंबरपूर्वी संबंधित शाखा कार्यालयात अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उजवा मुख्य कालव्याच्या सुरुवातीपासून १४ किमी. पर्यंत व डावा मुख्य कालव्याच्या २२ किमी. पर्यंतच्या लाभक्षेत्रातील सर्व वितरिका, जलाशयावरील अधिसूचित नदी–नाल्यांवरील लाभधारकांना रब्बी हंगामासाठी पाणी देण्यात येईल. वितरण व्यवस्थेद्वारे जिथे सुलभपणे पाणी जाऊ शकते, त्या ठिकाणापर्यंत कालवा संचलन कार्यक्रमानुसार 'शेवटाकडून ते मुखाकडे' (टेल टू हेड) या तत्त्वानुसार सिंचन होणे आवश्यक आहे.

नोव्हेंबर ते मार्च दरम्यान पाच वेळा पाणी मिळेल. कालव्याचे प्रवाही किंवा कालव्यावरील, नदी–नाल्यांवरील मंजूर उपसा सिंचन योजनांद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी मागणी अर्ज संबंधित शाखा कार्यालयात मोफत उपलब्ध आहेत. ते भरून १० नोव्हेंबरपर्यंत तिथेच सादर करावेत, असे आवाहन ऊर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाकडून करण्यात आले. रब्बी हंगामात नोव्हेंबर अखेरपर्यंत मागणीप्रमाणे सिंचनासाठी पाच पाणी पाळ्या देण्यात येतील.



कलर बॉक्स)लाभधारकांनी नियम पाळणे आवश्यकः थकित पाणीपट्टी भरा

इच्छुक लाभधारकांनी त्यांच्याकडीलथकबाकीची एक तृतीयांश व चालू हंगामाची अग्रिम पाणीपट्टी भरावी. उपसा सिंचन लाभधारकांनी नळमार्गावर पाणी मोजमाप यंत्रबसवावे. पिकांचे मागणी क्षेत्र २० आर या पटीत असावे. पाणी अर्ज मंजूर करून घेऊनच उपसा सिंचनासाठी पाणी वापर करावा. मंजूर क्षेत्रासाठी कालव्याचे पाणी घेण्यात येणारी शेतचरी व विहिरीवरील शेतचरी यात तीन मीटरचे अंतर असावे. उपसा सिंचन धारकांनी (उदा. कालवा, नदी वनाले) पाणी मंजूर करून घेऊनच उपसा सिंचनास पाणी वापर करावा.

# पोलिंग पार्टी मतदान केंद्रांपर्यंत पोहोचवण्यासाठी २३६ एसटी बस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** जिल्ह्यातील आठही मतदारसंघांतील २७०८ मतदान केंद्रांपर्यंत अधिकारी, कर्मचारी, ईव्हीएम व इतर साहित्य पोहोचवण्यासाठी जिल्हा निवडणूक विभागाद्वारे २८१ एसटी बसची मागणी करण्यात आली होती. परंतु, त्यापैकी २३६ एसटी बसचीच व्यवस्था करण्यात आली. त्याचवेळी अमरावती व बडनेरा – मतदारसंघासाठी एसटी बस पोलिंग पार्टीच्या कामी येणार नसल्याची – माहिती विभागीय नियंत्रक नीलेश बेलसरे यांनी दिली. पोलिंग पार्टीला – मतदान केंद्रांपर्यंत सुरक्षित पोहोचवून परत आणण्याची जबाबदारी ही आजवर एसटीचीराहिली आहे. लोकसभा लाभाथ निवडणुकीच्याही वेळी जिल्ह्यातील दुर्गम भागांपासून ते महानगरांमध्ये असलेल्या केंद्रांपर्यंत पोलिंग पार्टीला एसटीद्वारेच पोहोचवण्यात आले होते. राज्यभरात एकाचवेळी २० नोव्हेंबरला मतदान होणार असल्यामुळे इतरही ठिकाणांवरून एसटी बस मागवणे शक्य नाही. प्रत्येक विभागाला निवडणूक विभागाला एसटी त्यांच्या द्याव्याच लागतात. अमरावती एसटी विभागाकडे बसची उणीव असल्यामुळे त्यांनी आम्ही २३६ एसटी बस देऊ शकतो, असे जिल्हा निवडणूक विभागाला कळवले आहे. त्यामुळे उर्वरित बसची व्यवस्था करण्यासाठी इतर पर्यायांचा वापर करावा लागणार आहे



# ॲड. यशोमती ठाकूर यांचा प्रचाराचा धडाका सावंगा आसरा देवी येथे केली आरती

## शिराळा सर्कल मधील मतदारांशी साधला संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

मतदारसंघासोबतच जिल्ह्याच्या विकासासाठी ऍड.यशोमती ठाकूर यांच्याशिवाय पर्याय नाही त्यामुळे यशोमती ठाकूर ह्या आगामी निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने जिंकतील असा विश्वास यशोमती ताई ठाकूर यांना पदयात्रेदरम्यान नागरिकांनी दिला. यशोमती ठाकूर यांनी शिराळा सर्कल परिसरातील गावोगावी नागरिकांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला. दरम्यान आज सकाळी सावंगा आसरा देवी येथील मंदिरात आरती करून दर्शन घेतले व त्यानंतर यशोमती ठाकूर यांनी आपल्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसह महापुरुषांना वंदन करून पदयात्रा काढली.

प्रचार रॅली दरम्यान यशोमती ठाकूर यांचे गावोगावी जंगी स्वागत करण्यात आले.महिलांनी यशोमती ठाकूर यांना ओवाळून त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. विविध गावात नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याने यशोमती ताई देखील भावुक झाल्या. बैठका आणि विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी नागरिकांशी चर्चा केली. येणाऱ्या काळात तीवसा मतदार संघात विविध योजनां आणून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.भाजपा व त्यांच्या सहकाऱ्यांनी जनतेची दिशाभूल करून गरीब घटकावर अन्याय केला आहे. कमिशन खोर सरकारला खाली खेचण्यासाठी एकत्र येऊन महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन यशोमती ठाकूर यांनी एका कार्यक्रमादरम्यान केले. महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ आज शुक्रवार ८ नोव्हेंबर रोजी शिराळा, देवरा, देवरी, यावली,डवरगाव चिंचखेड,करजगाव, नांदुरा पिंगळई, धानोरा कोकाटे, ब्राह्मणवाडा गोविंदपुर या गावांना भेटी देऊन नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. शिराळा सर्कल मध्ये काढण्यात आलेल्या प्रचार यात्रेला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावून उस्फुर्त प्रतिसाद दिला. शिराळा सर्कल मध्ये यशोमती ठाकूर यांचे वर्चस्व असून त्यांना या भागातील मतदार मोठ्या मताधिक्याने कौल देतील असा विश्वास महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी बोलून दाखविला.आजच्या प्रचार यात्रेमध्ये प्रामुख्याने महाविकास आघाडीच्या सर्वच घटक पक्षातील कार्यकर्ते पदाधिकारी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्रीती बंड यांच्या सह शिवसेनेचे दिग्गज पदाधिकारी पक्षातून निष्काशीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

महायुती व महाविकास आघाडीतील बंडखोरी राजकीय पक्षांसाठी डोकेदुखीची ठरत आहेत. भाजपने बंडखोरांवर कारवाई केल्यानंतर शिवसेना (उबाठा) ने देखील बडनेरा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार प्रीती बंड यांच्यासह माजी आमदार धाने पाटील, नाना नागमोते, आशिष धर्माळे, प्रवीण अळसपुरे आणि मनोहर भूत यांना पक्षातून निष्कासित केले आहे.

भाजपने जिल्ह्यातील बंडखोर नेत्यांवर कारवाई केली असतांना शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांचा गुरुवारी अमरावती दौरा शिवसेना उबाठाची कारवाई झाला होता. यानंतर आज तात्काळ शिवसेना (उबाठा) पक्षातील बंडखोर नेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघात सेना (उबाठा) चे उमेदवार सुनील खराटे आहेत. परंतु उमेदवारी न मिळाल्यामुळे माजी आमदार स्व. संजय बंड यांच्या पत्नी श्रीमती प्रीती बंड यांनी बंडखोरी करीत उमेदवारी दाखल केली. त्यांची उमेदवारी कायम असून यामुळे शिवसेना (उबाठा) दोन गट पडले आहेत. प्रीती बंडयांच्या बंडखोरीमुळे अनेक शिवसैनिक त्यांच्या सोबत आलेआहेत. दरम्यान, शिवसेना (उबाठा)च्या वतीने आज प्रीती बंड, माजीआमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, नानानागमोते, आशिष धर्माळे, प्रवीणअळसपुरे, मनोहर बुध यांना सेनेतूननिष्कासित केले आहे.या कारवाईमुळे राजकीय वर्तुळातचांगलीच खळबळ उडाली आहे.प्रीती बंड तीन निवडणूकीत विजयीअसणाऱ्या आमदार रवी राणांविरोधात लढत देत आहेत.याच ठिकाणी सेना (उबाठा) चेसुनील खराटे, भाजपचे बंडखोरतुषार भारतीय व अपक्ष नितीन कदममैदानाच्या रिंगणात अहेत.

### अनेक मतदार म्हणतात आम्ही ऑटो चालविणार

या मतदारसंघात आढावा घेतला असताप्रीती बंड यांचा शिवसेनेतील अनेक दिग्गज नेते व कट्टर शिवसेनीक यांच्यावर कारवाई झाल्याने अनेक मतदार नाराज झाले आहे अनेकांच्या मनात प्रीतिताई व व त्यांच्या सोबतचे कार्यकर्ते यांच्या बद्दल सहानुभूती निर्माण झाली आहे.त्यामुळे मतदार म्हणतात आम्ही तर आता ऑटोच चालविणार मात्र या मतदार संघात अटीतटीची लढत होणार असल्याचे चित्र सध्या तयार झाले आहे.

# निवडणुकीत उमेदवारांनी वेळेवर खर्च सादर न करणाऱ्या सहा उमेदवारांना बजावल्या नोटीस




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ९ :अमरावती**

दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांनी वेळेवर निवडणूक खर्च सादर करावा, असे आवाहन करण्यात आले. या मतदारसंघाची पहिली खर्च तपासणी गुरूवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी पूर्ण करण्यात आली आहे. यात खर्च सादर केला नसलेल्या एका उमेदवारास नोटीस बजावण्यात आली आहे.दर्यापूर मतदारसंघात खर्चावर देखरेखीसाठीउमा माहेश्वरी यांची खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पहिली खर्च तपासणी नवीन तहसिल इमारत, दर्यापूर येथील सभागृहात पार पडली. यात १६ पैकी १५ उमेदवारांनी खर्च सादर केला. अनुपस्थित एका उमेदवारास ४८ तासांच्या आत निवडणूक खर्चाचे लेखे सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे. विहीत मुदतीत खर्च सादर केला नसल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. उमेदवरांच्या लेख्याची दुसरी तपासणी दि. ११ नोव्हेंबर, तर तिसरी तपासणी दि. १५ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे.

**अचलपूरात पाच उमेदवारांना नोटीस**

विधानसभा निवडणुकीसाठी खर्च सादर करण्यासाठी पहिली तपासणी शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. यात अनुपस्थित असलेल्या पाच उमेदवारांना नोटीस बजावण्यात आली आहे.खर्च निरीक्षक उमा माहेश्वरी यांच्या उपस्थितीत अचलपूर उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसरातील नवीन प्रशासकीय भवनाच्या सभागृहात खर्च तपासणी करण्यात आली. लेख्यांच्या पहिल्या तपासणीवेळी २२ पैकी ५ उमेदवार अनुपस्थित राहिले. या सर्व उमेदवारांना ४८ तासाच्या आत निवडणूक खर्चाचे लेखे सादर करण्याची नोटीस देण्यात आली आहे. विहीत मुदतीत खर्च सादर केला नसल्यास रितसर तक्रार दाखल करून सर्व परवानग्या तात्काळ रद्द करण्यात येणार आहे. तसेच पहिल्या तपासणीअंती उमेदवारनिहाय खर्च तात्पुरत्या स्वरुपाचा असून दुसऱ्या तपासणीदरम्यान दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी लेखा ताळमेळ बैठकीमध्ये खर्चास अंतिम स्वरुप देण्यात येणार आहे.

# श्यामनगर,रुक्मिणी नगर परिसरामध्ये डॉ. सुनील देशमुख यांच्या पदयात्रेने परिसर झाला काँग्रेसमय

### तीस वर्षाच्या राजकारणात प्रामाणिकपणे केवळ जनतेसाठी केलेल्या विकास कामांच्या बळावरच आपला विजय होणार : डॉ. सुनील देशमुख



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अमरावती विधानसभेचे महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर सुनील देशमुख यांचे प्रचारार्थ रुक्मिणी नगर परिसर येथे भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला नागरिकांचे प्रचार पद यात्रेला मिळणारे समर्थन ही जणू विजयाची नांदी ठरावी इतके अनमोल आहे. ठिकठिकाणी मातृशक्ती, ज्येष्ठ नागरिक यांनी डॉ. सुनील देशमुख यांचे औक्षवंत करून त्यांना विजयाकरिता शुभ आशीर्वाद दिले. शहरातील विविध भागात होत असलेल्या भव्य पदयात्रांमुळे संपूर्ण परिसर काँग्रेसने झालेला आहे. चहू बाजूंनी काँग्रेस पक्षाचे विजयी चिन्ह पंजाची घौडदौड अत्यंत वेगाने सुरू आहे.डॉ.सुनील देशमुख यांनी त्यांच्या कार्यकाळात अमरावती शहराचा बदललेला चेहरा मोहरा, पायाभूत सुविधांमध्ये निर्माणमध्ये केलेली भक्कम कामे, संपूर्ण शहरातील मुख्य दीर्घ काळ टिकणाऱ्या काँक्रीटर्स रस्त्यांचे निर्माण, वाढीव पाणीपुरवठा टप्पा, उन्नत विद्युत व्यवस्थेसाठी १०० कोटी रुपयांची आयपीडीएस योजना,उन्नत आरोग्य व्यास्थेकरिता सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल चे निर्माण,शहरतील उड्डाण पुलाचे निर्माण, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता प्रि - आयएएस कोचिंग सेंटर विकास हाच केंद्रबिंदू मानून आजवरची केलेली राजकीय वाटचाल याच्या भक्कम पाठबळावर डॉ.सुनील देशमुख यांचे उमेदवारी जनतेमध्ये अत्यंत लोकप्रिय होत आहे. नागरिकांचाही यांच्या पदयात्रांना प्रचंड प्रतिसाद मिळत असून ठीक ठिकाणी या पदयात्रेंचे स्वागत करण्यात येत आहे. आज सकाळी काँग्रेस भवन शामनगर चौकातून पदयात्रेला सुरुवात करण्यात आली पुढेही पदयात्रा श्याम नगर, राजेंद्र कॉलनी, परिसर मार्गे रुक्मिणी नगर मार्गे हमालपुरा चीचफैल इथून मार्गस्थ होत गणपती मंदिर येथे पदयात्रेचा समारोप करण्यात आला. नागरिकांनी मोठ्या संख्येने पदयात्रेमध्ये सामील होऊन डॉ.सुनील देशमुख यांना आपला भक्कम पाठिंबा दर्शविला. या पदयात्रांच्या धडाक्याच्या माध्यमातून डॉ. सुनील देशमुख यांच्या प्रामाणिक राजकीय वाटचालीवर नागरिकांनी शिक्कामोर्तबच केले आहे.

# प्रीतिताई बंड यांच्या पदयात्रेला उस्फुर्त प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

बडनेरा विधानसभेच्या अपक्ष उमेदवार लोकनेते, माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी प्रितीताई संजय बंड यांच्या प्रचार पदयात्रेला चैतन्य कॉलनी चौक येथुन सुरुवात करण्यात आली.

चैतन्य कॉलनी येथून शांतीनगर,प्रोफेसर कॉलनी, बेनोडा, भोवतेनगर,उत्तमनगर आदि भागात डोअर टू डोअरप्रचार पदयात्रा करून यशोदानगर येथे पदयात्रेचा समारोपीय कार्यक्रम झाला. प्रितीताई संजय बंड यांना बडनेरा मतदार संघातील ग्रामीण भागासोबतच शहरातील प्रचार पदयात्रेला प्रभागातील नागरिकांचा व मतदारांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.या प्रचार रॅली दरम्यान मतदारांनी त्यांच्यासमोर ठेवलेल्या व्यथा त्यांनी ऐकूण घेत आपण माझ्यावर विश्वासटाकून मतदार संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी दिल्यास बडनेरा मतदार संघातील सर्व समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन यावेळी प्रितीताई संजय बंड यांनी दिले.

# रवी राणा यांच्या पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद

## बडनेरा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रवी राणा यांचा पाना लोकांच्या मना-मनात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९बडनेरा**

भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले, पिरिपा कवाडे, लहूजी शक्ती सेना, शेतकरी संघटना महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या प्रचाराचा झंझावात सुरू आहे. संपूर्ण बडनेरा विधानसभा मतदारसंघात त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. प्रशांत नगर, शिक्षक कॉलनी, एलआयसी कॉलनी, मुदलियार नगर, मोती नगर, किरण नगर १, किरण नगर २परिसरात रवी राणा यांच्या पदयात्राचे जागोजागी स्वागत करण्यात आले. लाडक्या बहीणी ओवाळणी घालून त्यांना पुन्हा मोठ्या मताधिक्यांने निवडून यायचे आशीर्वाद देत आहे. आपल्या मनमिळाऊ स्वभावाचे धनी रवी राणा यांच्या आपला मुलगा आपल्या दारी यात्रेला उत्सुफूर्त प्रतिसाद मिळत आहे. या पदयात्रेत स्वयंस्फूर्तीने मातृ शक्ती पितृ शक्ती व युवा वर्ग मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत १५ ते १६ किलोमीटर पर्यंत पायदळ फिरून रवी राणा घरोघरी जाऊन मातृ शक्ती पितृ शक्ती यांचा आशीर्वाद घेत आहे. प्रशांत नगर, शिक्षक कॉलनी, एलआय,सी कॉलनी, मुदलीयार नगर, मोती नगर, किरण नगर १, किरण नगर नंबर २ परिसरात रवी राणा यांनी ४० कोटीचे विकास कामे केली आहेत. याबद्दल परिसरातील लोकांमध्ये रवी राणा यांच्या लोककल्याणकारी कामाबद्दल समाधान व्यक्त केल्या जात आहे. असेच चित्र संपूर्ण बडनेरा मतदारसंघात दिसत आहे. मातृ-पितृ शक्ती आणि युवा वर्ग यांच्या पुढाकाराने जागोजागी बैठकीचा धडाका सुरू आहे. रवी राणा यांच्या सतत जनसंपर्कातील आपुलकीने लोकांच्या मनात वेगळेच स्थान निर्माण केले आहे. हेच प्रमुख कारण आहे की, रवी राणा आल्यावर त्यांचे मनापासून स्वागत करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रात हजारो नागरिक, लाडक्या बहीणी त्यांच्या प्रचारासाठी सरसावले आहेत. यावेळी हजारो नागरिक व लाडक्या बहीणी यांनी रवी राणा यांच्या विजयाचा निर्धार कर पाणा निवडणूक चिन्हावर पुन्हा एकदा आपली मोहोर लावण्याचा संकल्प केला आहे. हे दृश्य पाहून विरोधकांना घाम फुटला आहे.




# रणधुमाळी विधानसभेची अन् मोर्चेबांधणी जिल्हा परिषदेची

## दुसऱ्या फळीतील पदाधिकाऱ्यांना आकर्षित करण्याची खेळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

विधानसभा निवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापत असतानाच दुसऱ्या फळीतील पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मोर्चेबांधणी सुरू केली आहे. विधानसभेच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांची पायाभरणी केली जात आहे. पदाधिकाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांच्या स्थानिक नेत्यांकडून आताच कोणाला उमेदवारी तर कोणाला पदांचे आश्वासन देण्याचा सपाटा लावला आहे.

जिल्ह्याच्या राजकारणात मिनीमंत्रालयाचे मोठे महत्त्व आहे. हे सभागृहग्रामीण भागाचे सत्ताकेंद्र मानले जाते.यासोबत शहरी भागात महा नगरपालिका व नगरपंचायतीतील सत्तेचेही महत्त्व आहेच. सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपल्याला मताधिक्यात भर घालण्याची क्षमता ठेवणाऱ्या प्रमुखपदाधिकाऱ्यांना हेरण्याचे काम महायुती व महाविकास आघाडीचे उमेदवार व प्रमुख नेतेमंडळींकडून सुरू आहे.

अशा पदाधिकाऱ्यांना खास भेटीचे निमंत्रण, उमेदवारी तसेच सत्ता आल्यास पद देण्यात येईल, असा शब्दही आतापासूनच दिला जात आहे.त्यामुळे येत्या काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदाधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात कोलांटउड्या पाहावयास मिळणार आहेत.





### बंडखोरीनंतर आता दगाफटक्याचा धोका

जिल्ह्यात महायुती व महाविकासआघाडीत बंडखोरी मोठ्या प्रमाणात उफाळून आली. बंडखोरांनी थेट अपक्ष उमेदवारी दाखल करून शह ठोकला. काही प्रमुख पक्षांचे महायुती वमहाविकास आघाडीतील मित्रपक्षांच्या नेत्यांशी विळ्या-भोपळ्याचे नाते आहे. अशा परिस्थितीत बंडखोरीनंतर मित्रपक्षांकडून दगाफटक्याचा धोका देखील आहे.यामध्ये कोण कोणाचे शिलेदार आपल्याकडे खेचतो, कोण कोणाला शह देतो, हे लवकरच कळणार आहे.

# प्रशासन कठोर; रात्री १० वाजतानंतर लाऊडस्पिकर वाजले तर होणार कारवाई

## पोलिसांची परवानगीही बंधनकारक : सकाळी सहापासून मिळतेय परवानगी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

अमरावती जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबरपासून सुरू झाली असून २५ नोव्हेंबरपर्यंत कायम राहणार आहे. ही निवडणूक विना अडथळा व शांततेने पार पाडण्यासाठी निवडणुकीच्या काळात लाऊडस्पीकर वापरण्यावर आयोगाने निर्बंध घातले आहेत. या नियमानुसार रात्री १० वाजतानंतर लाऊडस्पीकर लावल्यास कारवाई होऊ शकते. यासाठी तहसील व पोलिस प्रशासनाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे.

जिल्ह्यात विधानसभा निवडणूक कालावधीत उमेदवारांकडून शहर तसेच ग्रामीण भागातही लाऊडस्पीकरद्वारे प्रचार यंत्रणा राबविली जाते. याच अनुषंगाने निवडणूक आयोगाने काही निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील आठ ही विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीत कोणत्याही वाहनावर ध्वनिक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंतच तोही संबंधित पोलिस ठाण्याचे अधिकारी यांची रीतसर परवानगी घेऊनच करता येणार आहे.

वाहन चालू ठेवून ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्वप्रकारच्या ध्वनिक्षेपकाच्या वापरास वाहनावर बसवून किंवा अन्य प्रकारे दररोज सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यंत परवानगी राहील. सर्वराजकीय पक्षांचे पदाधिकारी, निवडणुकीतील उमेदवार किंवा ध्वनिक्षेपकाच्या वापराचे परवानगी विवरण मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी व जवळच्या पोलिस ठाण्याला देणे बंधनकारक राहील.

### निवडणूक पथकाची राहणार करडी नजर

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेचा तसेच निवडणूक नियमांचे उल्लंघन होणार नाही, यासंबंधीचे नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून पथक तयार करण्यात आले आहे. पथक कारवाईचा बडगा उगारणार आहेत. रात्री १० वाजतानंतर लाऊडस्पीकर लावल्यास संबंधितांवर कारवाई होणार आहे. यासाठी पोलिस प्रशासन लक्ष ठेवून राहणार आहे. तक्रारीची वाट न बघता थेट ते कारवाई करणार आहे. त्यामुळे लाऊडस्पीकर लावताना योग्य काळजी घेणे बंधनकारक आहे.

### २५ नोव्हेंबरपर्यंत आदर्श आचारसंहिता

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. याचे कोणत्याही प्रकारे भंग केल्यास ती व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल. हा आदेश १५ ऑक्टोबरपासून तिन्ही विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीत २५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत लागू राहणार आहे.

# मजुरांचे अड्डे ओस; जेवणावळी फुल्ल; मंडप-खुर्च्यांना डिमांड

## कॅटरिंग, बेरोजगार युवक, ऑटो, ट्रान्सपोर्टर आदींना मिळाला रोजगार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापत आहे. प्रचारात रॅली, मेळावे, बैठका, सभांचे सत्र सुरू झाले आहे. त्याचा परिणाम बांधकाम क्षेत्रासह अन्य क्षेत्रावर झाल्याची ओरड आहे. या निवडणुकांमुळे ठिय्यांवरील मजुरांची संख्या रोडावली असून, मजूर आता कामासाठी नाही, तर राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची प्रतीक्षा करीत उभे आहेत.



निवडणुकीत उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी जे काही प्रचाराचे प्रकार करावे लागत आहेत, त्यात हजारोंच्या हातांना काम मिळाले आहे. यात मंडप व्यावसायिक, कॅटरिंग, मजुरांचे ठिय्ये, खानावळी, बेरोजगार युवक, ऑटो, ई-रिक्षा, ट्रान्सपोर्टर आदींनाही रोजगार मिळाला आहे. मतदानाच्या दिवसापर्यंत या लहान-मोठ्या व्यवसायातील मजुरांच्या हाताला काम मिळणार आहे. यातून बऱ्यापैकी कामगारांना रोजीही मिळत आहे.

**जेवणावळीत गर्दी**

दिवसभर उमेदवारांच्या पाठीमागे भिंगरीसारखे फिरणे, उमेदवाराचे प्रचार कार्यालय राखणे, मतदारांच्या याद्या, घरोघरी चिठ्ठ्या पोहोचविणे आदी कामांत कार्यकर्ते कामाला लागले आहेत. त्यामुळे सायंकाळी श्रमपरिहार होणे गरजेचे आहे. रात्रीला शहराच्या बाहेरील धाब्यांवर, खानावळीत गर्दी वाढली आहे.

**फेटे, हारांची मागणी वाढली**

दिवाळीत लक्ष्मीपूजनाला फुलांचे दर वाढले होते. पण दिवाळीनंतरही फुलांचे दर अजूनही कमी झाले नाहीत. कारण, निवडणुकीमुळे फुलांची मागणी वाढलेली आहे. प्रचार रॅलीमध्ये, सभांमध्ये मोठ्या प्रमाणात फुलांचा वापर वाढला आहे. फेटेवाल्यांकडेही निवडणुकीचे काम जोरात सुरू आहे.

# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सक्रीय सहभागी नोंदवा-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

लोकसभा निवडणुकीत प्रशासन, नागरिक आणि संस्थांच्या मदतीने व्यापक जनजागृती मोहिम राबविण्यात आली. याचा परिणाम म्हणून मतदानाची टक्केवारीत तीन टक्यांकनी वाढ झाली. सर्वांनी दिलेल्या योगदानामुळे हे शक्य झाले आहे. या विधानसभा निवडणुकीतही सर्वांनी सक्रीय सहभाग नोंदवत मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.नियोजन भवनात मतदार जनजागृतीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, उपायुक्त कल्पना बावरकर, कौन बनेगा करोडपतीच्या विजेत्या बबीता ताडे यांच्यासह विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, लोकसभा निवडणुकीत संस्था आणि संघटनांच्या



माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले. यातून मतदारांमध्ये जनजागृतीसोबतच त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करण्याचे कार्य करण्यात आले. इतर ठिकाणी कमी मतदान झालेले असताना आपल्या जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढली हे स्वीप उपक्रमांचे यश आहे. समाजातील युवक, महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी अशा सर्व घटकांना उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्यात येत आहे.ग्रामीण भागात ७५ टक्के मतदान होत असताना या तुलनेत शहरी भागात मतदान होत नाही. यावेळी प्रामुख्याने शहरी भागामध्ये लक्ष केंद्रीत करून जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच कमी मतदान झालेल्या मतदान क्षेत्रामध्येही स्वीपचे उपक्रम जाणीवपूर्वक राबविण्यात येणार आहे. जनजागृतीसोबतच मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रामुख्याने पाणी, स्वच्छता, बसण्याची सोय आदी बाबींवर लक्ष देण्यात येणार आहे. मतदारांना सोयीचे व्हावे, यासाठी वोटर स्लीप देण्यात येत आहे. मतदारांना मतदान केंद्राची माहिती आणि याठिकाणी योग्य सुविधा मिळाल्यास मतदानाचा टक्का निश्चितच वाढण्यास मदत होणार आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी, जनजागृतीसाठी गावपातळीवरही उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांना चांगला अनुभव येण्यासाठी मतदान केंद्रावर सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.महापालिका आयुक्त श्री. कलंत्रे यांनी, मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यात खासगी आस्थापनांनी कर्मचाऱ्यांना सवलत आणि पगारी सुट्टी देणे, मतदान केंद्रावर दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना व्हीलचेअर आदी सुविधा देण्यात येणार आहे. तसेच जनजागृतीसाठी दि. ११ नोव्हेंबर रोजी रॅली काढण्यात येणार असून यात नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.यावेळी विविध संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी निवडणूक प्रक्रियेबाबत येणाऱ्या समस्यांची माहिती दिली. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला आहे. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले. श्री. खाते यांनी आभार मानले.



# निवडणूक कर्तव्यावरील ११ हजारांचे पोस्टल बॅलेटने मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात निवडणूक कर्तव्यावर ११ हजार २४८ अधिकारी-कर्मचारी असणार आहेत. त्यांच्या मतदानाची सोय पोस्टल बॅलेटने करण्यात येणार आहे. दुसऱ्या प्रशिक्षणादरम्यान या सर्वांना मतपत्रिका देण्यात येणार असून त्यांची मतदानाची सोय विधानसभा मतदारसंघनिहाय सुविधा केंद्रात केली जाणार आहे.येत्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग यांना घरून मतदान करण्याची सुविधा दिली आहे. घरून होणारे हे मतदान मतपत्रिकेद्वारे केले जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात २ हजार ४२२ ज्येष्ठ नागरिक, तर ४४० दिव्यांग मतदार यांच्यासोबतच ११ हजार २४८ अधिकारी, कर्मचारी असे एकूण १६ हजार ९७२ मतदार मतपत्रिकेद्वारे मतदान करणार आहेत.निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानाची सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून दिली जाते. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून प्रथम प्रशिक्षणादरम्यान पोस्टल बॅलेटने मतदान करण्यासाठी फॉर्म १२ भरून घेण्यात आला. सदर फॉर्म भरून दिलेल्या अधिकारी-कर्मचारी यांना त्यांनी विनंती केलेल्या विधानसभा मतदारसंघाची मतपत्रिका उपलब्ध करून दिली जाते. तसेच या मतपत्रिकेद्वारे मतदान करण्यासाठी सुविधा केंद्राची निर्मिती करण्यात येते. या सर्व कर्मचाऱ्यांना दुसऱ्या प्रशिक्षणादरम्यान दि. १२ आणि दि. १३ नोव्हेंबर रोजी मतपत्रिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहे.जिल्ह्यातील निवडणूक कर्तव्यावर असलेल्या धामणगाव रेल्वे मतदारसंघातील २ हजार ३१५, बडनेरा १ हजार ९७३, अमरावती २ हजार ७५०, तिवसा १ हजार ४५२, दर्यापूर २ हजार २३७, मेळघाट १ हजार ७७२, अचलपूर २ हजार ३१५ मोर्शी २ हजार १५८ असे एकूण १६ हजार ९७२ मतदार मतदान करणार आहेत. या सर्व मतदारांना मतदान करण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय सुविधा केंद्रातून मतदान करता येणार आहे.

# आक्षेप ठरला 'कच्चा'; तर सहा महिने तुरुंगवास

## मतदार बंधूंनो, व्हीव्हीपॅट वरील आक्षेप घेताना सावधान

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

व्हीव्हीपॅट म्हणजे 'व्होटर व्हेरिफाइड पेपर ऑडिट ट्रेल'. एखाद्या मतदाराने ज्या उमेदवाराला मतदान केले आहे, खरचं त्याच उमेदवाराला मत गेलं की नाही, याची खातरजमा करण्यासाठी मतदान केंद्रांमध्ये व्हीव्हीपॅट मशीनचा वापर करण्यात येतो. परंतु एखाद्या मतदाराने यावर आक्षेप घेतला आणि ते खोटे ठरले तर अशा मतदाराला सहा महिने कारावास आणि १ हजार रुपये दंडाची तरतूद निवडणूक आयोगाने केलेली आहे. त्यामुळे मतदार बंधूंनो आक्षेप



घेताना सावधान ! अन्यथा ते अंगलट येऊ शकते.

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदानपार पडणार आहे त्यासाठी सर्व विधानसभा मतदारसंघांतील प्रत्येक मतदान केंद्रांवर व्हीव्हीपॅट मशीनचा वापर करण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांची निवडणूक क प्रक्रियेवरील विश्वासार्हता वाढावी आणि ईव्हीएम मशीनबद्दल सर्वसामान्य माणसाच्या मनातील संशय दूर करण्यासाठी मतदाराने ईव्हीएममशीनवर त्याच्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोरचं दाबल्यानंतर त्याचे मत त्याच उमेदवाराला गेले की नाही याची पडताळणी करण्यासाठी व्हीव्हीपॅट बटन मशीनचा वापर करण्यात येतो.

यात उमेदवाराच्या नावासमोरचं बटन दाबल्यानंतर त्याचवेळी उमेदवाराचे नाव, क्रमांक आणि चिन्हयांचा उल्लेख असलेली व्हीव्हीपॅट स्लिप मशीनमध्ये सात सेकंदापर्यंत मतदाराला दिसते. त्यानंतर आपोआप ती स्लीप कट होऊन बीप वाजतो आणि ती स्लीप सीलबंद पेटीत जमा होते. परंतु एखाद्या मतदाराला आपण ज्या उमेदवाराला मतदान केले, त्या उमेदवाराऐवजी - वेगळ्याच उमेदवाराची चिठ्ठी - मशीनमध्ये दिसली अशी शंका आल्यास असा मतदार आक्षेप घेऊ शकतो. आक्षेप खरा ठरला तर मतदान थांबविले जाते. आणि जर आक्षेप खोटा ठरला तर त्या मतदारावर कार्यवाही केली जाणार आहे.

# धामणगाव रेल्वे मतदारसंघाची खर्च तपासणी पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातील नामनिर्देशित उमेदवारांच्या खर्चाच्या अहवालाची पहिली तपासणी पूर्ण करण्यात आली. शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी चांदूररेल्वे येथील तहसिल कार्यालयात लेख्यांची तपासणी करण्यात आली.विधानसभा निवडणुका शांततापूर्ण, भयमुक्त व पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी आणि उमेदवारांच्या खर्चावर देखरेख ठेवण्याकरीता खर्च निरीक्षक म्हणून वेंकन्ना तेजावथ यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी लेख्याची तपासणीकरीता तीन तारखा निश्चित केल्या आहेत. त्यानुसार पहिली तपासणी सभा पार पडली आहे. यात २४ उमेदवारांनी पहिल्या तपासणीवेळी त्यांचा दैनंदिन




खर्चाचा लेखा सादर केला.शॅडो खर्चाच्या नोंदवहित नोंदविलेल्या खर्चाशी मेळ नसलेल्या खर्चाबाबत उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी तेजश्री कोरे यांनी नोटीस बजावली आहे. नोटीस प्राप्त झाल्यापासून ४८ तासांच्या आत म्हणणे लिखीत स्वरुपात निवडणूक संनियंत्रण कक्ष, तहसिल कार्यालय, चांदुर रेल्वे येथे सादर करावे लागणार आहे. म्हणणे सादर केले नसल्यास सदर आक्षेप घेतलेला खर्च नोंदवहीनुसार उमेदवारांच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ठ करण्यात येणार आहे. तसेच नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.पहिल्या तपासणीअंती उमेदवारनिहाय खर्च तात्पुरत्या स्वरुपाचा असून निकालानंतर आयोजित लेखा ताळमेळ बैठकीमध्ये ताळमेळ घेऊन सदर खर्चास अंतिम स्वरुप देण्यात येणार आहे. अंतिम बैठकीनंतर खर्चाचा ताळमेळ झाल्यानंतर सदरचा खर्च भारत निवडणूक आयोगास सादर करण्यात येणार आहे. खर्च तपासणीवेळी खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ, तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.